जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2018
तरुण भारत



कोल्हापूर : शहाजी छत्रपती महाविद्यालयास प्र. कुलगुरू डॉ. टी. के. शिर्के यांनी सदिच्छा भेट दिली. भेटीदरम्यान, शाहू शिक्षण संस्थेचे मानद सचिव विजयसिंह बोंद्रे यांनी पुष्पहार देऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, प्रा. एकनाथ काटकर, प्रा. डॉ. डी. एल. काशीद, प्रा. डॉ. सुरेश शिखरे, प्रबंधक रवींद्र भोसले, अधीक्षक मनीष भोसले आदी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स




डॉ. शिंदे आणि प्रा. माशाळकर यांना पुरस्कार देण्यात आला.

# डॉ. शिंदे, प्रा. माशाळकर यांना पुरस्कार प्रदान

**शिराळा :** शिराळा तालुक्यातील चिखली येथील देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक महाविद्यालयाच्या अमर निसर्ग मंडळ आणि वसुंधरा संस्थेच्या वतीने शिवाजी विद्यापीठाचे उपकुल सचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि प्रा. शंकरराव माशाळकर यांना राज्यस्तरीय निसर्ग मित्र पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

चिखली ( ता. शिराळा) येथील देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक महाविद्यालयाच्या अमर निसर्ग मंडळाच्या वतीने भरविण्यात आलेल्या निसर्ग परिचय शिबिरावेळी हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.. वसुंधरा संस्थेच्या वतीने निसर्ग संवर्धन करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी हे पुरस्कार दिले जातात. या वेळी डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले,' पोट भरण्याचे तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या शास्त्रज्ञांना विसरून चालणार नाही. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे निसर्ग संवर्धित करून दयायचा आहे.'

16 FEB 2018 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दत्ता देशमुख एक कणखर नेते : जोगळेकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काय करायचे याचे आधीपासूनच नियोजन करणारे कॉ. दत्ता देशमुख एक कणखर नेते होते, असे प्रतिपादन अंबरनाथ (मुंबई) येथील कॉ. माधवराव जोगळेकर यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कॉ. दत्ता देशमुख अध्यासनातर्फे आयोजित 'कॉ. दत्ता देशमुख : जीवन व कार्य' या विषयावरील चर्चासत्रात त्यांचे बीजभाषण झाले. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहातील चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर, तर ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव प्रमुख उपस्थित होते. कॉ. जोगळेकर म्हणाले, नवजीवन संघटनेच्या माध्यमातून लोकांमध्ये शिक्षणविषयक जागृती निर्माण करण्याचे मोठे कार्य कॉ. देशमुख यांनी केले. देशामध्ये संघटनेच्या माध्यमातून सकारात्मक बदल घडवायचे, ही विचारधारा त्यांनी मांडली. डॉ. चौसाळकर म्हणाले, सन १९५० नंतरच्या महाराष्ट्राच्या राजकारणात कॉ. देशमुख यांनी अतिशय महत्वाची भूमिका बजावली. त्यांच्या प्रयत्नांमुळे न्याय, हक्क मागण्यांसाठी वीज कामगारांच्या संघटना निर्माण झाल्या. या कार्यक्रमास डॉ.भारत पाटणकर, मोहन देशमुख, कॉ. अतुल दिघे, सुरेश परचुरे, डॉ. टी. एस. पाटील, राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, नेहा वाडेकर, डॉ. एस. एस. महाजन, आदी उपस्थित होते. अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले.



शिवाजी विद्यापीठातील कॉ. दत्ता देशमुख अध्यासनातर्फे आयोजित चर्चासत्रात कॉ. माधवराव जोगळेकर यांचे बीजभाषण झाले. यावेळी डावीकडून डॉ. अशोक चौसाळकर, बाबा आढाव, भारती पाटील उपस्थित होत्या.

## पुढाकारातून प्रश्न सोडविले

राज्याच्या खेड्यापाड्यांत वीज कामगार विखुरलेला आहे, हे ओळखून त्यांना संघटित करण्याचा प्रयत्न कॉ. देशमुख यांनी केला. वीज कामगार, शेतमजूर, असंघटित कामगार, धरणग्रस्त लोकांचे पुनर्वसन यासाठी त्यांनी संघटनेच्या माध्यमातून पुढाकार घेऊन प्रश्न सोडविल्याशिवाय त्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केला असल्याचे कॉ. जोगळेकर यांनी सांगितले.

16 FEB 2018 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कॉम्रेड दत्ता देशमुख कणखर नेते

## माधवराव जोगळेकर : शिवाजी विद्यापीठात एकदिवसीय चर्चासत्र

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : स्वातंत्र्य प्राप्तीनंतर काय करायचे याचे आधीपासूनच नियोजन करणारे कॉम्रेड दत्ता देशमुख एक द्रष्टे आणि कणखर नेते होते, असे प्रतिपादन अंबरनाथ (मुंबई) येथील माधवराव जोगळेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कॉम्रेड दत्ता देशमुख अध्यासनाच्या वतीने आयोजित 'कॉम्रेड दत्ता देशमुख : जीवन व कार्य' विषयावरील एकदिवसीय चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. अशोक चौसाळकर होते. बाबा आढाव यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री. जोगळेकर म्हणाले, "महात्मा गांधीजींच्या काळात स्वातंत्र्यलढा समाजातील तळागाळातील घटकांपर्यंत पोचला होता. त्या काळात देशाला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काय करावयाचे, असे दोन मत प्रवाह होते. नवजीवन संघटनेच्या माध्यमातून लोकांमध्ये शिक्षणविषयक जागृती निर्माण करण्याचे मोठे कार्य देशमुख यांनी केले. देशामध्ये संघटनेच्या माध्यमातून सकारात्मक बदल घडवायचे, ही विचारधारा त्यांनी मांडली." ते म्हणाले, "राज्याच्या खेड्यापाड्यांत वीज कामगार विखुरलेला आहे, हे ओळखून त्यांना संघटित करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. वीज कामगार, शेतमजूर, असंघटित कामगार यांचे पुनर्वसन यासाठी त्यांनी संघटनेच्या माध्यमातून पुढाकार घेऊन प्रश्न सोडविण्याचा, त्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केला. वयामुळे कामगारांच्या मनात त्यांच्याबद्दल जिव्हाळा निर्माण झाला.'



कोल्हापूर : विद्यापीठातील चर्चासत्रात बोलताना माधवराव जोगळेकर.

डॉ. चौसाळकर म्हणाले, '१९५० नंतरच्या महाराष्ट्राच्या राजकारणात देशमुख यांनी अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली. देशमुख यांच्या प्रयत्नांमुळे न्याय, हक्क मागण्यासाठी वीज कामगारांच्या संघटना निर्माण झाल्या. त्याचा वीज कामगारांच्या पुढील पिढीला लाभ झाला. कॉ. देशमुख यांनी शेती, पाणी, पुनर्वसन, सामाजिक आणि राजकीय चळवळींमध्ये मोठे योगदान दिले.

डॉ. भारत पाटणकर, मोहन देशमुख, कॉ. अतुल दिघे, सुरेश परचुरे, डॉ. टी. एस. पाटील, राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. एस. एस. महाजन उपस्थित होते. समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. नेहा वाडकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 FEB 2018 पुढारी

# कॉ. दत्ता देशमुख द्रष्टे, कणखर नेते : कॉ. जोगळेकर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काय करावयाचे याचे आधीपासूनच नियोजन करणारे कॉ. दत्ता देशमुख एक द्रष्टे व कणखर नेते होते, असे प्रतिपादन मुंबई येथील कॉ.माधवराव जोगळेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कॉ. दत्ता देशमुख अध्यासनाच्यावतीने विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात 'कॉ. दत्ता देशमुख : जीवन व कार्य' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्र झाले. त्यावेळी बीजभाषण करताना कॉ. जोगळेकर बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर होते. यावेळी बाबा आढाव यांची प्रमुख उपस्थिती होती.

कॉ. जोगळेकर म्हणाले, महात्मा गांधीजींच्या काळात स्वातंत्र्य लढा समाजातील तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचला होता. त्या काळात देशाला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे आणि स्वातंत्र्य प्राप्तीनंतर काय करावयाचे, असे दोन मत प्रवाह होते. नवजीवन संघटनेच्या माध्यमातून लोकांमध्ये शिक्षणविषयक जागृती निर्माण करण्याचे मोठे कार्य कॉ.देशमुख यांनी केले. देशामध्ये संघटनेच्या माध्यमातून सकारात्मक बदल घडवायचे, ही विचारधारा त्यांनी मांडली. कामगारांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न मांडून त्यांची सोडवणूक करणारे नेतृत्व म्हणून कॉ.देशमुख पुढे आले. वीज कामगार, शेतमजूर, असंघटित कामगार, धरणग्रस्त लोकांचे पुनर्वसन यासाठी त्यांनी संघटनेच्या माध्यमातून पुढाकार घेऊन प्रश्न सोडविण्याचा, त्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केला. डॉ. चौसाळकर म्हणाले, १९५० नंतरच्या महाराष्ट्राच्या राजकारणात कॉ.दत्ता देशमुख यांनी अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी शेती, पाणी, पुनर्वसन, सामाजिक आणि राजकीय चळवळींमध्ये मोठे योगदान दिल्याचेही सांगितले.

अध्यासनाच्या समन्वयक डॉ.भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. नेहा वाडेकर यांनी आभार मानले. डॉ. भारत पाटणकर, मोहन देशमुख, कॉ. अतुल दिघे, सुरेश परचुरे, डॉ..टी.एस. पाटील, डॉ. प्रकाश पवार, डॉ. एस.एस. महाजन यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

16 FEB 2018
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठा बादशहा एकच छत्रपती झाला

## डॉ. जयसिंगराव पवार : प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगमध्ये व्याख्यान

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १५ : स्वराज्य नुसते स्थापन करून चालत नाही, तर ते राज्य उदात्त आणि चिरकाल टिकावे लागते. याचा धडा छत्रपती शिवाजी महाराजांनी घालून दिला. त्यांच्या रूपाने मराठा बादशहा एकच छत्रपती झाला, असा उल्लेख चरित्रकारांनी केल्याचे ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी आज नमूद केले.




कोल्हापूर : 'शिवाजी महाराज यांची हिंदवी स्वराज्याची संकल्पना' यावर बोलताना प्रा. डॉ. जयसिंगराव पवार. व्यासपीठावर आप्पासाहेब वणिरे, डी. बी पाटील, यशवंत लाड, प्रा. सी. आर. गोडसे आदी.

शिवाजी विद्यापीठाचा इतिहास विभाग व प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसच्या वतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. शिवजयंतीनिमित्त शिवाजी महाराज यांची हिंदवी स्वराज्याची संकल्पना' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. संस्थेचे अध्यक्ष डी. बी. पाटील, आप्पासाहेब वणिरे, यशवंत लाड, विभागप्रमुख डी. पी. चव्हाण, सी. आर. गोडसे, प्रा. सी. एम. गायकवाड आदी उपस्थित होते.

डॉ. पवार म्हणाले की, शिवाजी महाराजांना १७ व्या शतकात सार्वभौमत्व राज्याची कल्पना सुचली, हा चमत्कारच मानावा लागेल. छत्रपतींचे राज्य हे केवळ मराठ्यांचे नव्हते तर ते अठरा पगड जातींचे होते. हिंदवी स्वराज्याच्या नव्या युगाची सुरवात महाराजांनी केली. मराठे हे केवळ परकियांसाठी लढतात ही ओळख त्यांनी पुसून टाकली. तळागाळातील लोकांसाठी स्वराज्य हे त्यांचे अंतिम उद्दिष्ट होते. सैन्याने रयतेचे संरक्षण करायला हवे हा धडा त्यांनी घालून दिला. त्यांची राजनीती सर्वोच्च होती. आपले जेवढे आकलन आहे त्याच्या शंभर पटीने पुढे छत्रपतींचे आकलन होते. दिल्लीच्या बादशहाची चाकरी स्वीकारायची नाही हे त्यांनी सांगितले. स्वराज्य स्थापन करण्यामागील त्यांची संकल्पना उदात्त होती. स्वराज्य नुसते स्थापन करून चालत नाही तर ते उदात्त आणि चिरकाळ असावे लागते हे त्यांनी दाखवून दिले. राज्याभिषेक सोहळ्यावेळी मराठा बादशहा छत्रपती एवढाच झाला, असे चरित्रकार तथा बखरकाराने लिहिले. यातूनच छत्रपतींचे महत्त्व विषद होते.

डी. बी. पाटील यांनी शिवाजी महाराज यांची धर्मनिरपेक्षता, साधुसंतांचा आधार, आरमार बळकटीकरण, राज्यपदास प्रजेची मान्यता, व्यापार वाढ या संबंधीचा विचार आजच्या पिढीलाही प्रेरणादायी असल्याचे सांगितले. कविता गगराणी, चैताली महेकर यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2018
पुढारी

# शिवरायांच्या स्वराज्याची संकल्पना चिरकाल : डॉ. पवार



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवछत्रपतींनी निर्माण केलेल्या रयतेचे स्वतंत्र-सार्वभौम स्वराज्यात जाती-धर्म भेदभाव नव्हता. सर्व जाती-धर्मांचे लोक स्वराज्यात गुण्यागोविंदाने नांदत होते. किंबहुना त्यांनी दूरदृष्टीने निर्माण केलेल्या स्वराज्याची संकल्पना चिरकाल टिकणारी आणि उदात्त स्वरुपाची होती, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले.

शिवाजी पेठेतील प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू कॉलेज व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठा इतिहास' व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. यात 'शिवछत्रपतींची स्वराज्याची संकल्पना' या विषयावर डॉ. पवार यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी.बी. पाटील होते.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एन.व्ही. नलवडे यांच्या हस्ते झाले. आभार इतिहास विभागप्रमुख डॉ. बी. पी. चव्हाण यांनी मानले. यावेळी आप्पासाहेब वणिरे, प्रा. डॉ. कविता गगराणी, ए. बी. पाटील, य. ल. खाडे, सी.आर. गोडसे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2018
सकाळ

# विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेचा कार्यक्रम

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठातील कर्मचारी सहकारी पतसंस्था राबवित असलेल्या कर्मचारी हितावह विविध योजनांमुळे सभासदांचे संस्थेप्रती भावनिक नाते अतिशय दृढ झाले आहे, असे मत कोल्हापूर शहर सहकारी संस्थांचे उपनिबंधक पी. एम. बर्गे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्या सुवर्ण महोत्सव प्रारंभप्रसंगी आयोजित कार्यक्रमामध्ये ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

बर्गे म्हणाले, ''राज्यात पंचेचाळीस हजार कर्मचारी पतसंस्था आहेत. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या पतसंस्थेने आपल्या कार्यातून कर्मचारी सभासदांमध्ये फार मोठा विश्वास निर्माण केला आहे. विद्यापीठामध्ये मिळत असणारे शिक्षण हे उच्चदर्जाचे असल्यामुळे येथील कर्मचारी, प्राध्यापक महाराष्ट्र राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये उच्चपदावर विराजमान झालेले आहेत.'' अध्यक्षीय भाषणामध्ये विद्यापीठाचे प्र-कुलगुरू, डॉ. शिर्के म्हणाले, ''आजच्या काळातही सहकारी पतसंस्था यशस्वीरित्या चालू शकते, हे या पतसंस्थतील आजी-माजी कर्मचारी, संचालक, सभासद यांच्या सहकार्यामुळे सिध्द झाले आहे.'' अध्यक्ष राजेंद्र चव्हाण यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. उपाध्यक्ष जनार्दन सुरकुले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2018
Times of India

# University to continue with cluster system in sem exam

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) will continue its cluster initiative—appoitnment of supervisors for the purpose of examination— in the upcoming semester examination to be held in March.

Director of board of examinations and evaluation, SUK, Mahesh Kakade said the attendance of the supervisors has always posed a vital problem during the semester examinations and that the cluster initiative has helped a lot in resolving the issue.

He added for any examination, the senior supervisor holds an important place. Senior supervisors require senior authorities from the colleges and the university department. However, it has been found that many a times, university or college authorities are not willing to participate, resulting in last minute on a few people. Formation of clusters helps avoid last minute chaos.

Kakade added that every cluster has a lead college or department which looks after the supervisor requirement in their respective cluster during the semester examinations. They assign duties to the supervisors, thereby ensuring the smooth conduct of the exam.

He added that SUK has asked the coordinator of the clusters to hold a meeting with the principals or the head of the departments on appointing supervisors for the exam duties so as to avoid last minute chaos. The appointed senior supervisors list is to be submitted to the exam department too.

Kakade said that supervisors get their honorarium including travelling allowance. SUK has some 283 examination centres across the Kolhapur, Sangli and Satara districts and 40 departments in the campus. For smooth conduct of the exam, they need at least 325 supervisors. The cluster system helps out in streamlining the process.

16 FEB 2018 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK to evaluate one lakh answer sheets on screen

Piyush.Bhusar
@timesgroup.com

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) will expand the scope of on-screen evaluation to BCom final year answer sheets from the upcoming semester exam.

SUK director of board of examinations and evaluation Mahesh Kakade said the meetings regarding the upcoming semester exam are under way across Kolhapur, Sangli and Satara districts. The scope of expansion of the on-screen evaluation will be discussed and implemented by holding discussions with faculty members.

He said that previously, the university experimented with on-screen evaluation only with the pharmacy course. Only after its successful implementation is the on-screen evaluation being extended to B.Com final year course. Taking pharmacy and BCom together, the total number of answer sheets will be around 1 lakh.

Kakade said that apart from the said development, the university is planning to bring the re-evaluation of answer sheets of all courses under the purview of on-screen evaluation.

Under re-evaluation, the university gets around 20,000 applications every semester, mainly from the engineering faculty. If brought under on-screen evaluation, it will save the time as well as help in issuing speedy result, said an official from the university.

The official further added that the answer sheets of the students are scanned via on-screen evaluation method first and then saved under the pdf format. Teachers are given their login ids and a certain number of answer sheets are allotted to them which they have to evaluate on-screen.

Mumbai University was the first institution which tried to implement the on-screen evaluation on a full-fledged basis. It resulted in a fiasco as it delayed the issuance of results for several months and saw error-ridden mark sheets.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2018
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी स्टार्टअप इव्हेंट

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठात अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी स्टार्टअप इव्हेंट'चे आयोजन तंत्रज्ञान अधिविभाग आणि ओपेक्स सेंटर फॉर ट्रेनिंग अँड कन्सल्टन्सी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. १७) करण्यात आले आहे. सकाळी दहा ते दुपारी साडेचार या वेळेत कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमासाठी देवानंद लोंढे, डॉ.ए. एम. गुरव, तंत्रज्ञानविभागाचे प्रमुख डॉ. जयदीप बागी आदी मान्यवर उपस्थित असतील. यावेळी सचिन कुंभोजे स्टार्टअप विषयावर मार्गदर्शन करतील. दुपारच्या सत्रात स्टार्टअप फोरमसाठी विविध क्षेत्रांतील स्टार्टअप असणाऱ्या इंजिनिअर्सना मार्गदर्शन करणार आहेत. हा उपक्रम विद्यापीठ कार्यक्षेत्रातील अभियांत्रिकी आणि तंत्रनिकेतनचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाशी संपर्क साधावा.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2018
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात उद्या 'स्टार्टअप इव्हेंट'

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या तंत्रज्ञान अधिविभाग आणि ओपेक्स सेंटर फॉर ट्रेनिंगअँड कन्सल्टन्सी इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार १७ रोजी 'स्टार्टअप इंजिनिअर्स फोरम २०१८'चे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन विद्यापीठातील शाहू सिनेट हॉलमध्ये सकाळी १० वाजता पयोद. इंडस्ट्रीजचे चेअरमन देवानंद लोंढे यांच्या हस्ते होणार आहे. कौशल्य व उद्योजकता विकासकेंद्रप्रमुख डॉ. ए. एम. गुरव प्रमुख उपस्थिती दर्शवणार आहेत. तरी या कार्यक्रमास जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन तंत्रज्ञान अधिविभाग संचालक डॉ. जयदीप बागी यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स

## स्टार्टअप इव्हेंट उद्या

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या तंत्रज्ञानअधिविभाग आणि ओपेक्स सेंटर फॉर ट्रेनिंगअँडकन्सल्टन्सी इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (ता. १७) शिवाजी विद्यापीठाच्या सिनेटहॉल येथे स्टार्टअप इंजिनिअर्स फोरम २०१८ चे आयोजन केले आहे. सकाळी १० ते ४.३० या वेळेत हा कार्यक्रम होईल, अशी माहिती तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी दिली. या दिवशी स्टार्ट अप कनेक्ट प्रोग्रॅम आणि स्टार्टअपफोरम असे दोन कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. पहिल्या सत्रात तंत्रज्ञानविभागाचे प्रमुख डॉ. बागी आणि ओपेक्सचे प्रमुख सचिन कुंभोजे स्टार्टअप विषयांवर मार्गदर्शन करतील. दुपारच्या सत्रात स्टार्टअप फोरमसाठी विविध क्षेत्रातील स्टार्टअप असणाऱ्या इंजिनीअर्सना निमंत्रित केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2018
तरुण भारत

# विज्ञान कथा लेखन कार्यशाळा अर्ज नोंदणीसाठी आवाहन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग आणि कोल्हापूर विभागातील मराठी विज्ञान परिषदतर्फे विज्ञान कथा लेखनाची कार्यशाळा आयोजित केली आहे. ६, ७ आणि ८ मार्च दरम्यान होणाऱ्या कार्यशाळेचे उद्घाटन बडोदा येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. तरी महाविद्यालयीन विद्यार्थी व इच्छूकांनी आपले नाव, पत्ता आणि व्यवसायाची माहिती अर्जामध्ये नोंदवून २५ फेब्रुवारीपर्यंत हा अर्ज मराठी विभागात भरावा असे आवाहन केले आहे. तसेच या कार्यशाळेस प्रवेश विनामुल्य असल्याचे आयोजकांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स

# तंत्रज्ञान विभागातर्फे उद्योजक जागरूकता

कोल्हापूर : समृद्धी टीबीआय फाउंडेशनच्यावतीने शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागामध्ये उद्योजक जागरूकता कार्यक्रम झाला. यावेळी कोल्हापूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय, विद्यावर्धिनी इन्स्टिट्यूट, भारती विद्यापीठ लॉ कॉलेज यांनी सहभाग घेतला. यावेळी समृद्धी टीबीआय फाउंडेशनचे डायरेक्टर मनीष पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.